पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्या आस्थापनेवरील वरोरा व ब्रम्हपूरी पोलीस उपविभागाचे विभाजन करुन नवीन चिमूर पोलीस उपविभागीय कार्यालय निर्माण करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः अेपीओ-२७१५/प्र.क्र. २२६/पोल-३

मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : ०९ जानेवारी, २०१८.

<u>वाचा</u> :-

१) गृह विभाग शासन निर्णय क्रमांकः अेपीओ-३१११/प्र.क्र.१०७(अ)/पु.बां.२/पोल-३,दि.०४.०३.२०१४.
२) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि.०२.०६.२०१५.
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/ ५२५२/ क.सु.६२ / १७४/ २०१५, दि. ३०.०७.२०१५.
४) गृह विभाग, शासन पत्र क्र.अेपीओ-२७१५/प्र.क्र.२२६/पोल-३, दि.०५.१२.२०१६.
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/चंद्रपूर-चिमूर/ २०७/२०१५, दि. ०५.०६.२०१७.
६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/चंद्रपूर-चिमूर/ २०७/२०१५, दि. २७.१०.२०१७.

<u>प्रस्तावना</u> :-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधिन क्र.०३ येथे नमूद दिनांक ३०.०७.२०१५ च्या पत्रान्वये पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्या आस्थापनेवर अपर पोलीस अधीक्षकांचे कार्यालय निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. त्यामध्ये त्यांनी नमूद केले होते की, सन २०११ चे जनगणनेनुसार चंद्रपूर जिल्ह्याची लोकसंख्या २२,०४,३०७ इतकी असून चंद्रपूर जिल्ह्याच्या सीमेलगत नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्हा असल्याने सदर परिसरामध्ये नक्षलवादी कारवायांवर लक्ष केंद्रीत करणे गरजेचे झाले आहे. तसेच चंद्रपूर ते चिमुर येथील अंतर ९० कि.मी. पेक्षा जास्त असल्याने त्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाल्यास त्यावर वेळीच नियंत्रण करण्यास चिमुर येथे अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाची अंत्यत आवश्यकता आहे. तथापि उपरोक्त संदर्भाधिन क्र.०४ येथे नमूद दिनांक ०५.१२.२०१६ च्या

शासनपत्रान्वये चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर येथे अपर पोलीस अधीक्षक यांचे कार्यालय निर्माण करण्याऐवजी पोलीस उपअधीक्षकाचे कार्यालय निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सुचित करण्यात आले होते. त्यानुसार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधिन क्र.०५ येथे नमूद दिनांक ०५.०६.२०१७ च्या पत्रान्वये चिमूर येथे पोलीस उपअधीक्षक कार्यालय निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. तसेच उपरोक्त संदर्भाधिन क्र. ०६ येथे नमूद २७.१०.२०१७ च्या पत्रान्वये उपरोक्त संदर्भाधिन क्र.०१ येथे नमूद दिनांक ०४.०३.२०१४ च्या शासन निर्णयान्वये पोलीस प्रशिक्षण केंद्र, पांढरकवडा, जि.यवतमाळ करीता मंजूर करण्यात आलेल्या पोलीस उपअधीक्षकांच्या २० पदांपैकी ०१ पद प्रस्तावित चिमूर पोलीस उपविभागाकरीता स्थानांतरीत करण्याची शासनास विनंती केली आहे. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी उक्त पत्रांन्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u>:-

पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्या आस्थापनेवरील वरोरा व ब्रम्हपूरी पोलीस उपविभागाचे विभाजन करुन नवीन चिमूर पोलीस उपविभाग निर्माण करण्यास व सदर पोलीस उपविभागाकरीता उपरोक्त संदर्भाधिन क्र.०१ येथे नमूद दिनांक ०४.०३.२०१४ च्या शासन निर्णयान्वये पोलीस प्रशिक्षण केंद्र, पांढरकवडा, जि.यवतमाळ करीता मंजूर करण्यात आलेल्या पोलीस उपअधीक्षक (वेतनश्रेणी :- रु.१५६००-३९१००, ग्रेड पे रू.५४००) यांच्या २० पदांपैकी ०१ पद स्थानांतरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्या आस्थापनेवरील वरोरा व ब्रम्हपूरी पोलीस उपविभागाचे विभाजन करुन नवीन चिमुर पोलीस उपविभागाची निर्मिती झाल्यानंतर वरोरा पोलीस उपविभाग, ब्रम्हपूरी पोलीस उपविभाग व नवनिर्मित चिमूर पोलीस उपविभाग यांच्या अंतर्गत पोलीस ठाण्यांची पुर्नमांडणी ही खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे असेल :-

अ.क्र.	पोलीस उपविभागाचे नाव	पोलीस उपविभागाअंतर्गत समाविष्ट असणारी पोलीस ठाणी
१.	वरोरा पोलीस उपविभाग	वरोरा, भद्रावती, माजरी.
२.	ब्रम्हपूरी पोलीस उपविभाग	ब्रम्हपूरी, नागभिड, तळोधी व सिंदेवाही.
३.	**चिमूर पोलीस उपविभाग (नवनिर्मित)**	**चिमूर, शेगांव, भिसी.**

३. उपरोक्त नवनिर्मित चिमूर पोलीस उपविभागीय कार्यालयाकरीता आवश्यक असलेले पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार व पोलीस शिपाई हे मनुष्यबळ व इतर साधनसामग्री पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्या आस्थापनेवर उपलब्ध असलेल्या मनुष्यबळातून व साधनसामग्रीतून पुरविण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि.०२.०६.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०९१७१८०४०६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kailas A. Gaikwad

Digitally signed by Kailas A. Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, cn=Kailas A. Gaikwad
Date: 2018.01.09 17:22:47 +05'30'

(कैलास गायकवाड)
उप सचिव, गृह विभाग

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा.राज्यमंत्री, गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव.

३. मा.राज्यमंत्री,गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव.
४. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.
८. जिल्हाधिकारी, चंद्रपूर.
९. पोलीस अधीक्षक, चंद्रपूर.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११. जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ.
१२.जिल्हा कोषागार अधिकारी, चंद्रपूर.
१३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
१४. वित्त विभाग, कार्यासन व्यय-७/ वित्तीय सुधारणा-१.
१५. निवड नस्ती, पोल-३.